# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी भंडारा यांचे कार्यालय, भंडारा

जा. क्र. ससंअभं/भरती प्रक्रीया/५३२/२०१८ दि. २१/०९/२०१८

## जाहीर सूचना

शासनाच्या आदेशाप्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५(३) अन्वये भंडारा जिल्हातील ज्या न्यायालयात नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्त्याची नेमणूक झाली नाही अशा न्यायालयातील फौजदारी प्रकरणे चालविण्याकरीता १२ विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्याचे पॅनल तयार करावयाचे आहे. त्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे.

| अ.क्र | विवरण | कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज स्विकारण्याची तारीख | दि. २५/०९/२०१८ ते ०८/१०/२०१८ |
| २ | लेखी परीक्षेकरीता निवड झालेल्या पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि. १२/१०/२०१८ |
| ३ | लेखी परीक्षा | दि. २५/१०/२०१८ |
| ४ | लेखी परीक्षेत उर्त्तिर्ण झालेल्या उमेदवाराना मूलाखती करीता तारीख नतंर कळविण्यात येईल. | -- |

तरी इच्छूक वकीलानी खाली दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे दिनांक ०८/१०/२०१८ पर्यत अर्ज स्विकारण्यात येतील. अर्ज दिलेल्या नमून्यात परीपूर्ण भरून **कार्यालय- सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, प्रशासकीय इमारत कक्ष क्र. ४ राष्ट्रीय महामार्ग क्र. ६, च्या बाजूला भंडारा. दूरध्वनी क्र. ०७१८४-२५०५२९** यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत (सूटीचे दिवस वगळून) अर्ज नमूना, स्वत:चा अचूक पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व वैयक्तीक तपसिलासह (बायोडाटा) अर्ज सादर करावेत.

उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

### अटी व शर्ती

१. उमेदवार वकील संघाचा सदस्य असावा.
२. सर्व साधारन उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. व मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. सध्या कार्यरत विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना लेखी परीक्षेत शासनाच्या दि. ०८/०९/२०१५ रोजीच्या सूचनेनूसार उच्च वयोमर्यादेत ४५ वर्षाव्यतिरीक्त अन्य कोणतीही सूट नाही.
४. उमेदवारास कमीत कमी ५ वर्ष फौजदारी प्रकरणे चालविण्याचा अनूभव असावा. व अनूभवाबाबतचे प्रमाण पत्र सादर करावे. तसेच अर्जासोबत आवश्यक कागजपत्राची यादीनूसार छायांकित प्रती सादर करावे. १) मराठी/इग्रंजी/हिन्दी भाषेचे ज्ञान असल्याबाबत प्रमाणपत्र. २) बार कॉन्सील नोंदणीचे प्रमाणपत्र. ३) बार असोशियनचे नोंदणीचे प्रमाणपत्र. ४) कायदयाची पदवी ५) जात प्रमाणपत्र.
५. उमेदवारावर कोणत्याही प्रकारची फौजदारी स्वरूपाची केस प्रलंबित नसावी. किंवा त्यास शिक्षा झालेली नसावी.
६. प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारास जेव्हा मा. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, यांचे कडे काम असले तेव्हाच काम देण्यात येईल.
७. प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारास शासनाविरूध्द कोणत्याही न्यायालयात फौजदारी स्वरूपाचे काम करता येणार नाही.
८. प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारास मा. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, यांनी न्यायालयात काम दिल्यास गृहविभाग महाराष्ट्र राज्य यांनी वेळोवेळी सूचीत केलेल्या मापदंडाप्रमाणे मानधन देण्यात येईल.

९. उमेदवाराने अर्जामध्ये दिलेली माहिती चूकीची अथवा खोटी आढळून आल्यास त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात येईल.

१०.उमेदवाराची लेखी परीक्षा घेण्यात येणार असून वस्तूनिस्ठ प्रश्न Cr.P.C, Evidence, IPC,Other Criminal Act. यावरील प्रश्न विचारण्यात येईल. लेखी परीक्षा (८० मार्क) व मूलाखतीस (२० मार्क) एकूण १०० मार्क पैकी अंतीम वरीयता क्रम ठरवला जाईल. व लेखी परीक्षेमध्ये सर्वात जास्त गूण प्राप्त करणारे ३६ उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

११.उमेदवाराची लेखी परीक्षा/मूलाखत मा. जिल्हादंडाधिकारी भंडारा. मा. पोलीस अधिक्षक भंडारा, मा. संचालक अभियोग संचालनालय, मूंबई. किंवा मा. उपसंचालक, अभियोग संचालनालय, नागपूर परीक्षेत्र नागपूर किंवा मा. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, भंडारा या निवड समिती मार्फत घेण्यात येईल. एकूण १२ पदांची निवड करण्यात येउन ७ पदे भरण्यात येतील व ५ पदे प्रतिक्षायादीत ठेवण्यात येउन आवश्यकतेनूसार भरण्यात येतील.

१२.मूलाखतीमध्ये न्यायदंडाधिकारी न्यायालयात चालणाऱ्या सर्व प्रकरणांच्या कायद्याविषयी फौजदारी प्रक्रीया संहिता, सर्व विशेष कायदे व वेळोवेळी कायद्यामध्ये झालेल्या सूधारणा व न्यायनिवाडा याबाबत उमेदवारांची मौखिक चाचणी घेण्यात येईल.

१३.विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता, यांचे पद मानधनानूसार असून पूर्णत: अस्थाई स्वरूपाचे आहे. त्यांना शासकीय पदाचे कोणतेही लाभ अथवा फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.

१४. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून शासनाचा पूर्णवेळ सेवक नियुक्ती नसलेले कितीही वर्षे काम पाहिले तरी त्यांना नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदावर हक्क सांगता येणार नाही.

१५. जिल्हयाचे सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता हे पर्यवेक्षी व नियंत्रण अधिकारी असल्याने त्यांच्या सूचनेचे व आदेशाचे पालन करणे बंधनकारक असेल.

१६. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता, यांची कॉन्ट्रॅक्ट पध्दतीनूसार मानधनावर निवड करण्यास येत असून निवड झालेल विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता, यांना नियमित शासकिय पदावर हक्क बजावता येणार नाही. व त्याबाबत कोठेही दाद मागता येणार नाही. दाद मागितल्यास पॅनलवरून कमी करण्यात यईल.

जिल्हादंडाधिकारी, भंडारा

**प्रतिलीपी: -**

१. अध्यक्ष / सचिव, भंडारा बार काउंसिल, भंडारा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. त्यांना विनंती करण्यात येतेकी सदर जाहिर सूचना बार काउंसीलच्या सूचनाफलकावर प्रसिद्ध करून सर्व सदस्यांना अवगत करावे व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावा.

२. अधिक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. सोबत संलग्न केलेली जाहीर सूचना कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिद्ध करून या कार्यालयास प्रसिद्धी अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा.

३. सहाय्यक अधीक्षक दिवाणी व फौजदारी न्यायालय/ तालूका: ________ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. सोबत संलग्न केलेली जाहिर सूचना कार्यलयाचे सूचना फलकावर प्रसिद्ध करून या कार्यालयास प्रसिद्धी अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा.

जिल्हादंडाधिकारी, भंडारा

Application Form

( Proforma of thr Application for the appointment of Special Assistant Pubic Prosecutor)

| Photograph |
|---|
| |

| | | |
|---|---|---|
| 1 | Post Application for :- | |

2 Category (ST/VJNT-A/NT-C/NT-D/SBC/OBC/OPEN):-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | Full Name of Applicant (Starting with Surname)<br>Father's/Husband's Name | | :-Shri/Smt. | |
| 4 | Residential address | | | |
| | Permanent Address | | Temporary Address | |
| | Room/Flat/Bldg.No. | | Room/Flat/Bldg.No. | |
| | Village/Post. | | Village 'Post. | |
| | Taluka | | Taluka | |
| | Road | | Road | |
| | District/City | | District/City | |
| | State | | State | |
| | Pin | | Pin | |
| | Phone No. (O) | | Phone No. (O) | |
| | (R) | | (R) | |
| | Mobail No. | | Mobail No. | |

| | | |
|---|---|---|
| 5 | (a) Date of Birth. (DD/MM/YY)<br><br>(b) Age on the date of Application (DD/MM/YY) | :-<br><br>:- |

| | | |
|---|---|---|
| 6 | Place of Birth | :- |

| | | |
|---|---|---|
| 7 | Whether Candidate is Domicile in the State of Maharashtra | :- |

| 8 | Educational Qualifications (details of the examination from S.S.C/H.S.C.) | | | |
|---|---|---|---|---|
| Name of the Examination | Name of Universityh/Board/Institution | Subjects | Class | Year of passing |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

a) Total number of years of practice :-

| Name of the courts where practised. | Total no.of Criminal matters conducted. |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

| 9 | Languages known :- |
|---|---|
| | (Read----------------,--------------------,-------------------,----------------,) |
| | (Write-----------------,----------------------,-------------,---------------------,) |
| | (Speak-------------------,--------------,-----------------,----------------------,) |

| | | |
|---|---|---|
| 10 | Whether the Application is involved in any Criminal Offence(to specify the details of offence)If so,whether convicted/acquitted | |

| DECLARATION |
|---|
| I------------------------------------------------------------------------------------------------, do hearby state that whatever is started hereinabove is true and corret to the best of my knowledge and belief and if any information is found to be false and incorrect, my appointment as Speacial Assistant Public Prosecutor, if made shall stand automatically cancelled and I shall be liable for futher necessary action. |
| Date :-<br>Place:- Signature of Applicant. |

N.B.

| | |
|---|---|
| 1 | Candidate shall append the required true copies of testimonials,certificates and documents,duly attested by the Gazetted Officer |
| 2 | canvassing in any for shall disqualify the application. |
| 3 | The Applicant shall produce the Character Certificate from any two Senior Advocates/Senior Counsels. |
| 4 | The Applicant shall affix his recent passport size photograph with his signature. |

| | | |
|---|---|---|
| (a) | Whether enrolled as member of the Bar Council of Maharashtra and Goa. | *(specity the registration no. and date)* |